**Deputy Superintendent of Police, ACB, Nandurbar**
पोलीस उपअधीक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, नंदुरबार
पत्ता – १२, जयनद नगर, कोरीट रोड, नदुरबार, ता.जि. नदुरबार–४२५४१२
कार्यालय सपर्क कमांक – ☎ (०२५६४) २३०००९
इमेल आयडी – dyspacbnandurbar@gmail.com.in

दिनांक :–०७/०१/२०२२

# प्रेस नोट

**आलोसे १) श्री. अजय किका पाडवी, वय–४० वर्ष, व्यवसाय–कनिष्ठ सहायक, म.रा.सहकारी आदिवासी विकास महामंडळ नंदुरबार जि.नंदुरबार आलोसे २) श्री.रामसिंग प्रतापसिंग गिरासे, वय–४७ वर्ष, व्यवसाय–चौकीदार, म.रा.सहकारी आदिवासी विकास महामंडळ नंदुरबार जि.नंदुरबार यांना ५०००/–रुपये लाचेची मागणी करुन ती स्विकारतांना रंगेहात पकडले बाबत...**

---

यातील मुळ तक्रारदार हे शेती व्यवसाय करतात. तक्रारदार यांची करणखेडा गाव शिवारात नंदुरबार रोडवर गट नं २७ व ११२ मध्ये ३० एकर शेत जमिन आहे. सदर शेती तक्रारदार यांचे वडीलांचे नावावर आहे. सन २०२१ मध्ये दिवाळीचे सुमारास निघालेली अंदाजे २०० क्विटल ज्वारी त्यांचे करणखेडा येथील त्यांचे गोडावुन मध्ये ठेवलेली आहे. सदर ज्वारी खराब असल्याचे सांगुन तुझी ज्वारी तु विकु शकत नाही असे आलोसे क्र. १ व २ यांनी सांगुन तुला जर ज्वारी विकायची असेल तर प्रति क्विटल २०० /– रूपये प्रमाणे दयावे लागतील असे सांगुन तडजोडीअंती प्रती क्विटल ५० रूपये लागतील अशी लाचेची मागणी केली आहे.

तरी आलोसे क्र. १ व २ यांनी तक्रारदार यांचेकडे प्रती क्विटल ५० रुपये अशी लाचेची मागणी करुन ५०००/– रु लाचेची रक्कम आज दिनांक ०७/०१/२०२२ रोजी पंच व साक्षीदार यांच्या समक्ष धान्य गोदाम टोकरतलाव ता.जि.नंदुरबार येथे स्विकारली असुन त्यांना पंचसाक्षीदारांसमक्ष रंगेहाथ पकडण्यात आलेले आहे.

सदर कामगिरी पोलीस उपअधीक्षक,श्री. राकेश चौधरी,पोलीस निरीक्षक, समाधान महादु वाघ, पोहवा/उत्तम महाजन, पोहवा/विजय ठाकरे, पोहवा/विलास पाटील, पोना/अमोल मराठे, पोना/चित्ते, चापोना/महाले अॅन्टी करप्शन ब्युरो, नंदुरबार पथकाने केली आहे.

**अॅन्टी करप्शन ब्युरो, नंदुरबारतर्फे नागरिकांना आवाहन करण्यांत येत आहे की,** कोणत्याही शासकीय निमशासकीय कार्यालयामध्ये कोणी अधिकारी/कर्मचारी किंवा त्यांचे वतीने इतर खाजगी इसम लाचेची मागणी करीत असतील, तर कृपया अॅन्टी करप्शन ब्युरो, नंदुरबार कार्यालयाशी **दूरध्वनी नंबर (०२५६४) २३०००९, मोबाईल नंबर.८८८८८०५१०० व टोल फ्री क्र. १०६४ वर संपर्क साधावा,** असे आवाहन पोलीस उप अधीक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, नंदुरबार यांनी केले आहे.

7/1/22
(राकेश चौधरी)
पोलीस उपअधीक्षक,
ला.प्र.वि.नंदुरबार

Email ID :-www.dyspacbnandurbar@gmail.com
Mobile App :-www.acbmaharashtra.net
Facebook Page :- www.Facebook.com/MaharashtraACB

Scanned with CamScanner